# नाशिक महानगरपालिका, नाशिक

दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

**कोटेशन नोटीस** 2024

**विषय :** DAY- NULM अंतर्गत स्वच्छता क्षेत्रात काम करत असलेल्याALF/SHG यांच्या सशक्तीकरणासाठी UNDP भारत द्वारे कचरा वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या Electric Vehicle प्रकल्प राबविणेकामी इच्छुक बचतगटांचे अर्ज मागविणे बाबत.

दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) भारत यांच्या सहकार्याने, अभियानांतर्गत महाराष्ट्र व आसाम या राज्यातील निवडक शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाचे मानक सुधारण्यासाठी उपक्रम हाती घेतला आहे. कचरा संकलन आणि व्यवस्थापनासाठी इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराचा यशस्वी प्रकल्प तयार करून निव्वळ शून्य उत्सर्जन उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हा उपक्रम योगदान ठरणार आहे.

याकामी UNDP द्वारे नाशिक मनपाला एकुण 6 इलेक्ट्रिक वाहन (EV) उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कचरा संकलन आणि व्यवस्थापनासाठी इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराचा यशस्वी प्रकल्प तयार करून शून्य उत्सर्जन व महिलांना उपजीविकेची संधी हा उद्देश येथे ठेवण्यात आलेला आहे.

या उपक्रमांतर्गत बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देऊन वाहन चालक तसेच कचरा विलगीकरणाच्या (स्वच्छता दूत) माध्यमातून उपजीविकेची संधी निर्माण करून देणे ही मुख्य भूमिका असणार आहे. यात

1. इलेक्ट्रिक वाहनाद्वारे घराघरांतून आणि व्यावसायिक ठिकाणांहून कचरा गोळा करणे.
2. सुका आणि ओला कचरा वेगळा करणे आणि त्याचा योग्य वापर करणे.
3. कचऱ्यावर प्रक्रिया करून उत्पन्न मिळवणे -कंपोस्टिंग, रिसायकलिंग आणि कचऱ्यापासून इंधननिर्मिती.
4. महिला साठी रोजगार निर्मिती.

प्राप्त वाहनांना पार्किंग शेड व्यवस्था, चार्जिंग व्यवस्था करणे इत्यादी जबाबदारी ही संबंधित महानगरपालिका यांची असणार आहे तसेच बचतगटांनी वाहन ताब्यात घेतल्यानंतर वाहनाचे देखभाल व दुरुस्ती करिता बचतगट जबाबदार असतील.

करिता स्वच्छता क्षेत्रात काम करत असलेल्याALF/SHG यांचेमार्फत उपरोक्त प्रकल्प राबविणेकामी इच्छुक बचतगटांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. सविस्तर माहितीसाठी NULM विभागात संपर्क साधणे. सदरील कोटेशन नोटीसीस अनुसरून आपले अर्ज दिनांक ०९/०४/२०२५ ते दिनांक ११/०४/२०२५ रोजी दुपारी 4.00 वाजेपावेतो मा. उपायुक्त NULM, राजीव गांधी भवन, नाशिक येथे बंद लिफाफ्यात सादर करावे.

Sd/-

उपायुक्त (NULM)

नाशिक महानगरपालिका, नाशिक